# विश्वकर्मा हस्तकला जागरूकता, प्रात्यक्षिक उपक्रम आजपासून

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १७** - विश्वकर्मा विद्यापीठ आणि कोल्हापूरस्थित हस्तकला सेवा केंद्र यांच्या विद्यमाने १८ ते २० डिसेंबरदरम्यान हस्तकला प्रात्यक्षिक व जागरूकता उपक्रमाचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये हस्तकलेविषयी जागरूकता आणि प्रसार व्हावा, यासाठी आयोजित करण्यात आल्याचे विद्यापीठाच्या आर्ट आणि डिझाइनचे अधिष्ठाता प्रा. निशांत कंबोज यांनी सांगितले.

भारत हा प्राचीन काळापासून हस्तकलेसाठी प्रसिद्ध आहे. मध्ययुगीन भारतातून हस्तकलेच्या अनेक उत्पादनांची निर्यात होत असे. औद्योगिक क्रांतीने मात्र सर्वच वस्तूंच्या मोठ्या संख्येने उत्पादनाचा भडिमार सुरू केला. आता ही कला पुन्हा एकदा तरुण पिढीसमोर आणून तिला जागतिक महत्व प्राप्त करून देणे आवश्यक झाले आहे. त्याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून विश्वकर्मा विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. शेवटच्या दिवशी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून ते सर्वांसाठी खुले राहणार आहे, असे प्रा. कंबोज यांनी सांगितले.